# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय

(कला व वाणिज्य)

(अचलपूर कॅम्प) परतवाडा जि. अमरावती (महाराष्ट्र)

## योगशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल - 2019-20

आजच्या काळातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी वर्तमान शिक्षणामधून विद्यार्थ्यांना योगशिक्षण प्रदान करणे आवश्यक आहे. हा उद्देश्य लक्षात घेवूनच सत्र 2019-20 मध्ये योगशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविलेले कार्यक्रम आणि प्राप्त केलेल्या उपलब्ध्याचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे :-

- योगशास्त्र विभागामध्ये शैक्षणिक वेळापत्रक 2019-20 नुसार बी.ए. भाग-1,2,3 आणि एम.ए भाग-1,2 वर्गांच्या नियमितपणे सैद्धांतिक आणि प्रात्याक्षिक तासिका घेण्यात आल्या.
- योगशास्त्र आणि शारीरिक शिक्षण विभागाव्दारे 21 जून 2019 ला 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. उमेकर, प्रमुख अतिथी प्रा. डॉ. अरुण घोगरे, माजी प्राचार्य श्री. डॉ. आर. महाजन, या कार्यक्रमाचे संचालन प्रा. एस. भागवत (शारीरिक शिक्षण विभागप्रमुख) आणि योग प्रात्याक्षिक सत्र प्रा. एन. बुराडे (योगविभाग प्रमुख) तसेच आभार प्रदर्शन प्रा. डॉ. पी. गारोडे यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.
- योगशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनसाठी 11 सप्टेंबर 2019 ला 'मालिश चिकित्सेचे महत्व' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावर व्याख्यान देण्यासाठी डॉ. एन. डी. काळे (एच. व्ही. पी. एम. अमरावती) यांना बोलावण्यात आले होते. या व्याख्यानाला प्रा. एन. ए. बुराडे (विभागप्रमुख) आणि एम. ए. योगशास्त्राचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.
- 'योग आणि ध्यान' या योजनेनुसार 07 नोव्हेंबर 2019 ते 20 नोव्हेंबर 2019 पर्यंत महाविद्यालयातील इतर शाखा/विभागातील अंतिम वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आरोग्याच्या दृष्टिकोनातून योग प्रात्यक्षिक वर्गाचे आयोजन करण्यात आले. या वर्गांचा कालावधी दोन आठवडे असून हे प्रात्याक्षिक वर्ग हिवाळी अवकाशामध्ये प्रा. एच. बी. कास्देकर यांनी घेतले.
- योगशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास करण्याच्या दृष्टीने बी.ए भाग-1,2,3 आणि एम.ए भाग-1,2 योगशास्त्र या वर्गांमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.
- योगशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून बी.ए भाग-1,2,3 आणि एम.ए भाग-1,2 योगशास्त्र या वर्गांमध्ये गटचर्चा घेण्यात आली.
- योगशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना शिकविल्यानंतर विषयाचे किती ज्ञान झाले हे पडताळून पाहण्यासाठी शैक्षणिक वेळापत्रकातील तारखेनुसार बी.ए. भाग-1,2,3 आणि एम.ए भाग-1,2 वर्गांच्या घटक चाचण्या घेण्यात आल्या.

Scanned with CamScanner

- योगशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वेळापत्रकानुसार बी.ए. भाग-1,2,3 आणि एम.ए भाग-1,2 वर्गांच्या अभ्यासक्रमानुसार अंतर्गत मूल्यमापन करण्यासाठी गृहपाठ देण्यात आले.
- योगशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत डिसेंबर 2017 मध्ये संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन योग स्पर्धेत भाग घेवून उत्कृष्ट कामगिरी पार पाडत कु. प्रिया पंधाराम (एम.ए-1) यांना कलर कोट प्राप्त झाला.
- अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योग स्पर्धा राजीव गांधी विद्यापीठ नुझविड, आंध्रप्रदेश येथे दिनांक 10-01-2020 ला संपन्न झालेल्या स्पर्धेत कु. प्रिया पंधराम हिने सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ महिला योग संघाचे प्रतिनिधित्व केले.
- अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा आंध्रप्रदेश करीता चि. शुभम पिहुलकर (एम.ए भाग-1 योगशास्त्र) या विद्यार्थ्याची सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या पुरुष योग संघामध्ये राखीव खेळाडू म्हणून निवड झाली.

(प्रा. एन. ए. बुराडे)
योगशास्त्र विभाग प्रमुख
बी. एस. पाटील. महाविद्यालय, परतवाडा

Scanned with CamScanner